शनिवार, दि. ४ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २१४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

[illegible] हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# आता काढा धिंड! प्रत्येक आरोपींवर पोलीसी खाक्या दाखवा

## समाजाचे नुकसान करणाऱ्या गुटखा माफीया, सट्टेबाज, भू माफीया यांची पोलीस धिंड करणार का?

**जालना । प्रतिनिधी -** शहरात गेल्या आठवड्यात काँग्रेस सेवा दलाचे जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याने खळबळ उडाली होती. या प्रकरणातील आरोपींना अटक केल्यानंतर कदीम जालना पोलिसांनी त्यांची भररस्त्यातून धिंड काढली. या कारवाईचे सर्वसामान्य नागरिकांमधून स्वागत होत असले, तरी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केल्याप्रकरणी संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर आता कायदेशीर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. आता पोलीसांनीच ठरवावे सर्वच गुन्हेगारांवर आरोपींवर पोलीसी खाक्या दाखवाव्यात, व प्रत्येकांचीच धिंड काढावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे समाजाचे नुकसान करणाऱ्या गुटखा माफिया, सट्टेबाज, भू माफिया, वाळु माफिया, भुरटे चोर, दरोडेखोर अशा विविध प्रकारे गुन्ह्यात आरोपी असलेल्या प्रत्येकांचीच पोलीस धिंड काढणार का?

शेख इब्राहिम यांच्यावरील हल्ल्यानंतर पोलिसांनी मुन्ना बशीर खान आणि बबलू बशीर खान या सराईत गुन्हेगारांना बेड्या ठोकल्या. गुन्हेगारांचा वचक कमी करण्यासाठी पोलिसांनी त्यांना नूतन वसाहत परिसरातून चालवत नेले. ज्या गल्लीबोळात गुन्हेगारांची दहशत होती, तिथेच त्यांना मान खाली घालून फिरायला लावल्याने ''पोलिसी खाक्या'' दिसला, अशी चर्चा शहरात रंगली.

**सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा उघड अवमान?**

नागरिकांच्या दृष्टीने ही कारवाई योग्य वाटत असली, तरी भारतीय संविधानाच्या चौकटीत ती गंभीर गुन्हा ठरू शकते.

प्रेम शंकर शुक्ला विरुद्ध दिल्ली प्रशासन या गाजलेल्या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे की, आरोपीची सार्वजनिक धिंड काढणे हे मानवी प्रतिष्ठेचे हनन असून ते कलम २१ (जीवनाचा आणि स्वातंत्र्याचा अधिकार) चे उल्लंघन आहे. जोपर्यंत गुन्हा सिद्ध होत नाही, तोपर्यंत आरोपीला निर्दोष मानले जाते. अशा परिस्थितीत त्याची धिंड काढणे हे पोलिसांच्या अधिकाराबाहेरचे कृत्य आहे.

**पोलीस नियमावली आणि शिस्तभंग**

महाराष्ट्र पोलीस नियमावलीनुसार, आरोपीला न्यायालयात हजर करताना त्याच्या सुरक्षिततेची जबाबदारी पोलिसांची असते. सार्वजनिक ठिकाणी अशा प्रकारे प्रदर्शन करणे हे कस्टोडियल टॉर्चर च्या कक्षेत येते. यापूर्वी अनेक प्रकरणांत अशा प्रकारे धिंड काढणाऱ्या पोलीस निरीक्षकांवर आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची किंवा दंडात्मक कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

कायदेतज्ज्ञांच्या मते, जर पोलिसांनीच कायदा हातात घेतला, तर न्यायव्यवस्था आणि पोलीस प्रशासन यातील अंतर पुसले जाईल. शिक्षा देण्याचा अधिकार केवळ न्यायालयाला आहे. अशा घटनांमुळे पोलीस अधिकाऱ्यांवर मानवी हक्क आयोगाकडून गंभीर ताशेरे ओढले जाऊ शकतात, ज्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांच्या करिअरवर आणि पदोन्नतीवर मोठा परिणाम होऊ शकतो.

जालना पोलिसांच्या या रिअल ॲक्शनमुळे शहरात तात्पुरता धाक निर्माण झाला असला, तरी वरिष्ठ पोलीस प्रशासन याकडे कसे पाहते, हे महत्त्वाचे आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अवमान प्रकरणी दोषी आढळल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे.

कायद्याचा वचक हा तपासातील पारदर्शकता आणि पुराव्यांच्या मजबुतीतून निर्माण व्हायला हवा, केवळ प्रदर्शनातून नाही, असे मत मानवी हक्क कार्यकर्त्यांकडून व्यक्त केले जात आहे.

गुटखा मफिया, सट्टेबाज, भू माफिया, वाळू माफिया या सारख्या आरोपींची पोलीस आता धिंड काढणार का? असाही प्रश्न निर्माण होतो आहे.

जालना जिल्ह्यात अनेक पत्रकारांवर हल्ले झाले, धमक्या देण्यात आल्या, तक्रारी झाल्या काही प्रकरणात गुन्हे दाखल झाले. मात्र, त्या आरोपींची कधी पोलीसांनी धिंड काढली नाही. लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारांप्रती पोलीस प्रशासनाची भुमिका नेहमीच संशयास्पद राहीली आहे. २३ डिसेंबर २०१४ रोजी पत्रकार अर्पण गोयल यांच्यावर हल्ला झाला होता. या हल्ल्यात गोयल गंभीर जखमी झाले होते. असे असतांना त्यांच्यावर हल्ला करणारेच पोलीसांना शोधता आले नाही ही मोठी शोकांतिका म्हणावी लागेल. त्यानंतरही बरेच प्रकरणे घडली. नुकतेच पत्रकार भरत मानकर यांना जिल्हा परिषदेत धक्काबुक्की करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. त्यावर कदीम जालना पोलीसांनी पत्रकार संरक्षण कायद्याप्रमाणे गुन्हा ही दाखल केला मात्र, त्याचा तपासही गुलदस्त्यात आहे. अशा वेळी पोलीसांना त्यांच्या पोलीसी खाक्या दाखवता आल्या नाहीत.



# ड्रायव्हिंग स्कूलच्या नूतनीकरणात दिरंगाई

## सहा महिने फाईल धूळखात, मुख्यमंत्र्यांकडे तक्रार

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** शासकीय कामात कशा प्रकारे दिरंगाई केली जाते, याचा एक धक्कादायक प्रकार छत्रपती संभाजीनगर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात समोर आला आहे. ड्रायव्हिंग स्कूलच्या नूतनीकरणाची फाईल कोणत्याही कारणाशिवाय तब्बल ६ महिने प्रलंबित ठेवल्याप्रकरणी आता थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार करण्यात आली असून, संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संदीप सोनवणे यांचे छत्रपती संभाजीनगर येथे भाग्यलक्ष्मी मोटार ड्रायव्हिंग स्कूल आहे. त्यांनी आपल्या ड्रायव्हिंग स्कूलच्या नूतनीकरणासाठी () २ सप्टेंबर २०२५ रोजी रीतसर अर्ज दाखल केला होता. या अर्जाची प्रत्यक्ष पडताळणी १६ ऑक्टोबर २०२५ रोजी मोटार वाहन निरीक्षक संदीप शिंदे यांनी पूर्ण केली. त्यानंतर सर्व तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन १९ सप्टेंबर २०२५ (नोंदणीनुसार) रोजी ही फाईल वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या टेबलावर निर्णयासाठी सादर करण्यात आली होती.

**परिपत्रकाचा धाब्यावर बसवला मान**

परिवहन आयुक्तांच्या परिपत्रक क्रमांक ११४७८ (दि. ११.१०.२०२४) नुसार, कोणत्याही ड्रायव्हिंग स्कूलच्या नूतनीकरणाची फाईल प्राप्त झाल्यानंतर त्यावर ७ दिवसांच्या आत विनाविलंब निर्णय घेणे बंधनकारक आहे. मात्र, छत्रपती संभाजीनगर कार्यालयात या नियमाची पायमल्ली झाल्याचे चित्र आहे.

सप्टेंबर २०२५ पासून ते ३१ मार्च २०२६ पर्यंत, म्हणजेच तब्बल ६ महिने उलटूनही या फाईलवर कोणतीही टिपणी करण्यात आली नाही किंवा अर्जाबाबत कोणतेही लेखी उत्तर देण्यात आले नाही. शासकीय आदेशांचे उल्लंघन करून अर्जदाराला नाहक त्रास दिला जात असल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.

या गंभीर दिरंगाईबाबत जिल्हाध्यक्ष विकास काळे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस यांना पत्र लिहून या प्रकरणाची दखल घेण्याची विनंती केली आहे.

तक्रारीतील मुख्य मागण्या:
आरटीओ कार्यालयातील संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची चौकशी व्हावी., ७ दिवसांत निर्णय घेण्याच्या शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल दोषींवर शिस्तभंगाची कारवाई व्हावी., सर्वसामान्यांच्या कामात अडवणूक करणाऱ्या प्रवृत्तींना आळा बसावा.

आता या तक्रारीनंतर मंत्रालय स्तरावरून छत्रपती संभाजीनगर आरटीओ प्रशासनावर काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पुण्यात जबरी चोरी करणारा तडीपार आरोपी जालन्यात जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई



**जालना । प्रतिनिधी -** पुणे शहरातून तडीपार करण्यात आलेल्या एका अट्टल गुन्हेगाराला जालना स्थानिक गुन्हे शाखेने शिताफीने अटक केली आहे. फारुख सत्तार शेख (वय २७, रा. देवमूर्ती, जालना) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, त्याने पुण्यात चैन स्नॅचिंग केल्याची कबुली दिली आहे.

जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल यांनी जिल्ह्यातील तसेच जिल्ह्याबाहेरील विविध गुन्ह्यांतील फरार आरोपींचा शोध घेण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले होते. या मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व त्यांचे पथक कार्यरत असताना, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत एक महत्त्वाची माहिती मिळाली.

पुणे परिसरातून तडीपार असलेला आरोपी फारुख सत्तार शेख हा सध्या जालन्यातील जामवाडी परिसरात लपून बसला असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती.

**पोलिसी खाक्या दाखवताच दिली गुन्ह्याची कबुली**

मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जामवाडी परिसरात सापळा रचून फारुखला ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता, त्याने आपल्या एका साथीदारासह पुणे येथील बालाजीनगर भागात एका महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन जबरदस्तीने हिसकावून नेल्याची (चैन स्नॅचिंग) कबुली दिली.

या संदर्भात जालन्याने पुणे येथील भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यात संपर्क साधला असता, तिथे आरोपीविरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर १७०/२०२६, पान २ वर

# छत्रपती संभाजीनगरमध्ये नो-पार्किंग वाहन जप्ती प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

## नागरिकांकडून कठोर नियमांची मागणी

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** शहरातील नो-पार्किंग क्षेत्रात वाहन जप्ती (/) करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कामकाजावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. या संदर्भात आरटीआय व मानवाधिकार कार्यकर्ते महेश अशोकराव गवळी यांनी महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देऊन तातडीने कारवाईची मागणी केली आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, शहरातील अनेक ठिकाणी वाहन जप्ती करणारे कर्मचारी कोणताही अधिकृत गणवेश परिधान करत नाहीत तसेच ओळखपत्र () देखील दाखवत नाहीत. यामुळे संबंधित कर्मचारी अधिकृत आहेत की नाहीत, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. शिवाय, या कर्मचाऱ्यांची पोलीस पडताळणी झाली आहे की नाही याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसल्याने सुरक्षेचा प्रश्नही निर्माण झाला आहे. महेश गवळी यांनी या प्रकरणात विविध कायद्यांचा आधार घेतला आहे. , १९८८ व , १९८९ नुसार वाहन जप्तीची कारवाई अधिकृत व्यक्तीकडूनच होणे आवश्यक आहे. तसेच कलम १७० (सरकारी कर्मचारी असल्याचे भासवणे) आणि कलम ४१९/४२० (फसवणूक) अंतर्गत अशा प्रकारच्या गैरप्रकारांवर कारवाई होऊ शकते, असे त्यांनी नमूद केले. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांनी काही महत्त्वाच्या मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश सक्तीचा करणे, ओळखपत्र परिधान करणे बंधनकारक करणे, सर्वांची पोलीस पडताळणी करणे आणि अधिकृत कर्मचाऱ्यांची यादी सार्वजनिक करणे यांचा समावेश आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे शहरातील वाहनधारकांमध्ये चिंता व्यक्त होत असून, महानगरपालिका प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये पडझड

**मुंबई -** इराण अमेरिका आणि इस्रायल युद्धामुळे जगभरातील बाजारपेठांमध्ये प्रचंड अनिश्चितता आहे. संपूर्ण जग युद्धाच्या संकटाखाली आहे. शेअर बाजाराला उतरती कळा लागलीय. तर दुसरीकडे सोन्या-चांदीच्या किमतींमध्ये मोठी पडझड दिसून येत आहे. मागील तीन-चार दिवसांपासून सातत्याने सोन्या- चांदीच्या किमती पडताना दिसतायत.

आज शुक्रवारी ( ३ मार्च ) २४ कॅरेट सोन्याची किंमत ३0२0 रुपयांनी घसरलीय. आज १० ग्रॅम सोन्यामागे ग्राहकांना एक लाख ४९ हजार ४७० रुपये द्यावे लागतील. तर, काल चांदीचा दर २ लाख ४३ हजार ५०० एक रुपयांवर स्थिरावला होता. आज किलोमागे चांदी २ लाख ३२ हजार ९०० रुपयांवर पोहोचली आहे. आज चांदीचा दर जवळपास १० हजार रुपयांनी उतरला आहे. गेल्या महिन्याभरापासून सोने चांदीच्या दारात प्रचंड चढ-उतार सुरू आहेत . परिणामी ग्राहकांना सोनं खरेदी करावं की नाही हा संभ्रम कायम आहे. जागतिक बाजारपेठेतील अनिश्चितता, मध्यपूर्व भागातील तणाव, युद्धासंबंधी होणारे निर्णय, घोषणा या पान २ वर

# योजनेच्या नावाखाली रुग्णांची लूट? खाजगी रुग्णालयांवर मनसेचा गंभीर आरोप

## खाजगी हॉस्पिटलचे ऑडिट करा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडू - राहुल रत्नपारखे

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील काही खाजगी रुग्णालयांकडून विविध शासकीय योजनांच्या नावाखाली रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे शहराध्यक्ष राहुल रत्नपारखे यांनी केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित खाजगी रुग्णालयांचे ऑडिट करण्यात यावे, अशी मागणी त्यांनी जालना जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा चिकित्सक डॉ. प्रताप पाटील यांच्याकडे केली आहे.

राहुल रत्नपारखे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, काही खाजगी रुग्णालयांमध्ये रुग्णांना शासनाच्या विविध आरोग्य योजनांचा लाभ देण्याचे आश्वासन दिले जाते; मात्र प्रत्यक्षात त्याच रुग्णांकडून व त्यांच्या नातेवाईकांकडून मोठ्या प्रमाणात रक्कम वसूल केली जात असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. गरीब व सर्वसामान्य नागरिक आजारपणाच्या संकटात असताना अशा प्रकारे त्यांची आर्थिक लूट होणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक रुग्णांना उपचारासाठी भरमसाठ बिले दिली जात असून, काही प्रकरणांमध्ये शासन योजनेअंतर्गत मिळणाऱ्या



सुविधांबाबत स्पष्ट माहितीही दिली जात नाही. परिणामी, रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांना दुहेरी आर्थिक फटका बसत असल्याचा आरोप मनसेने केला आहे.

''आरोग्यसेवा ही व्यवसायाची नव्हे, सेवाभावाची असावी''

राहुल रत्नपारखे यांनी सांगितले की, आरोग्यसेवा ही सर्वसामान्यांसाठी दिलासा देणारी व्यवस्था असावी; मात्र काही ठिकाणी ती व्यवसायिक शोषणाचे केंद्र बनत चालल्याची भावना जनतेत निर्माण झाली आहे. रुग्णांना अडचणीच्या काळात मदत मिळण्याऐवजी आर्थिक दबावाला सामोरे जावे लागत असेल, तर प्रशासनाने अशा बाबी गांभीर्याने घेणे आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले.

जिल्हा चिकित्सकांनी तत्काळ पाऊल उचलावे

मनसेच्या वतीने जिल्हा चिकित्सक डॉ. प्रताप पाटील यांनी जालना शहरातील खाजगी रुग्णालयांची तपासणी करून, कोणत्या योजनांअंतर्गत किती रुग्णांना लाभ देण्यात आला, किती रक्कम आकारण्यात आली, तसेच रुग्णांकडून अतिरिक्त पैसे तर घेतले गेले नाहीत ना, याची चौकशी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. जर या चौकशीत गैरप्रकार उघड झाले, तर संबंधित रुग्णालयांवर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी मनसेने केली आहे.

तीव्र आंदोलनाचा इशारा

या संदर्भात मनसेने प्रशासनाला इशारा देत म्हटले आहे की, जर खाजगी रुग्णालयांकडून होणाऱ्या कथित आर्थिक पान २ वर

संपादकीय पान

## देशभक्ती रुजवणारे कलाकार

हिंदी चित्रपट सृष्टीतील जेष्ठ अभिनेते मनोज कुमार यांचा आज पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी ४ एप्रिल २०२५ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले होते त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीवर शोककळा पसरली होती. मनोज कुमार हे हिंदी चित्रपट सृष्टीतील एक नावाजलेले कलाकार होते. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले दशभक्तीवरील चित्रपट त्याकाळात खूप गाजले होते. मेरे देश की धरती..., सरफरोशी की तमन्ना...., एक प्यार का नगमा है...., पाणी रे पाणी तेरा रंग कैसा... अशी अनेक अजरामर गाणी मनोज कुमार यांच्यावर चित्रित झाली आहेत. आजही स्वातंत्र्य दिनी आणि प्रजासत्ताक दिनी त्यांच्या देशभक्तीवरील चित्रपटातील गाणी आवर्जून वाजवली जातात. मनोज कुमार यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी झाला. मनोज कुमार यांचे खरे नाव हरकिशन गिरी स्वामी असे होते. मनोज कुमार यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती. दिलीप कुमार हे त्यांचे आवडते अभिनेते होते. त्यांच्यावर दिलीप कुमार यांचा मोठा प्रभाव होता. त्यांनी मनोज कुमार हे नाव धारण करण्यामागेही दिलीप कुमार हेच होते. शबनम या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेल्या पात्राचे नाव मनोज कुमार असे होते. या चित्रपटात दिलीप कुमार यांनी साकारलेले मनोज कुमार हे पात्र त्यांना इतके भावले की त्यांनी स्वतःचे नाव मनोज कुमार असेच ठेवले. १९५७ साली शहीद चित्रपटाद्वारे मनोज कुमार यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत प्रवेश केला. हा चित्रपट खूप गाजला. या चित्रपटातील त्यांनी भगतसिंग यांची भूमिका प्रेक्षकांना खूप भावली. आपला पहिलाच देशभक्तीपर चित्रपट यशस्वी झाल्याने त्यांनी पुढे अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली. मनोज कुमार यांनी उपकार या देशभक्तीपर चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले. लाल बहादूर शास्त्री यांनी दिलेला जय जवान...जय किसान.... हा नारा त्यांनी या चित्रपटाद्वारे प्रेक्षकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. हा चित्रपट त्या काळात खूप गाजला. या चित्रपटातील गाणी तर खूप गाजली. मेरे देश की धरती.... हे अजरामर गाणे याच चित्रपटातले. उपकार नंतर पुरब और पश्चिम, हरियाली और रास्ता, रोटी कपडा और मकान, क्रांती, हिमालय की गोद में या देशभक्तीपर चित्रपटांची निर्मितीही त्यांनी केली हे सर्व चित्रपट खूप गाजले. या चित्रपटाद्वारे त्यांनी प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवण्याचा प्रयत्न केला. मनोज कुमार यांनी अनेक देशभक्तीपर चित्रपटांची निर्मिती केली म्हणून त्यांना भारतकुमार हे टोपण नाव पडले. त्यांनी निर्माण केलेले आणि अभिनय केलेले देशभक्तीवरील चित्रपट खूप गाजले होते. शोर, पत्थर के सनम, दो बदन, मेरा नाम जोकर हे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील खूप गाजले. मनोज कुमार यांना त्यांच्या अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. उपकार या चित्रासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. २००५ साली चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च अशा दादासाहेब फाळके पुरस्काराने गौरविण्यात आले. १९९२ साली भारत सरकारने पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन गौरवले. मनोज कुमार यांनी चित्रपटाद्वारे प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या निधनाने प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारा कलाकार काळाच्या पडद्याआड गेला असेच म्हणावे लागेल. मनोज कुमार यांचा सारखा कलाकार पुन्हा होणार नाही. प्रेक्षकांमध्ये देशभक्ती रुजवणारे जेष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# रणरागिणी छत्रपती ताराराणी यांच्या समाधीस्थळी जागतिक दर्जाचे स्मारक उभारणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** रणरागिणी छत्रपती ताराराणी यांच्या संगम माहुली (ता. सातारा) येथील समाधीस्थळी जागतिक दर्जाचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असून, त्यासाठी तातडीने आराखडा तयार करण्याचे निर्देश राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांनी दिले आहेत. या स्मारकासाठी आवश्यक निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे आणि मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक डॉ संजय लाखेपाटील,सातारा जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख अंकुश कदम, करण गायकर, रघुनाथ चित्रे, राहुल डिघोळे, शरद देशमुख तसेच प्राचार्य मोरे आदींनी उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी ताराराणी यांच्या समाधीची सद्यस्थिती व ऐतिहासिक वारशाच्या जतनासंदर्भातील मुद्दे मांडण्यात आले. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे यांनी सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे पर्यटनमंत्री शंभुराजे देसाई यांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत अशी माहिती डॉ संजय लाखेपाटील यांनी दिली असून तज्ज्ञ इतिहासकार व वास्तुविशारदांची समिती स्थापन करून स्मारकाचा आराखडा तयार करण्यात यावा, असेही सांगण्यात आले. सदर प्रस्तावानुसार संगम माहुली येथील परिसराचा विकास रणरागिणी छत्रपती ताराराणी व मराठेशाहीच्या शौर्यगाथेचे जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून करण्याचा मानस आहे. तसेच ताराराणी यांच्या कार्याचा सखोल अभ्यास व्हावा यासाठी कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठात स्वतंत्र अभ्यासकेंद्र स्थापन करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. याशिवाय शालेय व उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमात त्यांच्या कार्याचा समावेश करणे, मुंबईतील महत्त्वाच्या ठिकाणांना त्यांचे नाव देणे, तसेच त्यांच्या सन्मानार्थ पुतळा उभारणे अशा विविध मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. स्मारक उभारणीसाठी सुमारे १५० ते २०० कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, अनुभवी वास्तुविशारदांकडून आराखडा तयार करण्यासाठी राजेंद्र कोंडले यांच्याकडे समन्वयाची जबाबदारी



सोपवण्यात आली आहे. तसेच या सर्व विषयांवर पुढील आठवड्यात बैठक घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ संभाजी शिंदे हे लवकरच संगम माहुली येथे भेट देऊन समाधीस्थळाची पाहणी करणार असल्याची माहितीही डॉ संजय लाखेपाटील यांनी दिली आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अरबी समुद्रातील स्मारकाच्या कामास गती देण्यासाठीही संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन ठोस निर्णय घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या निर्णयामुळे इतिहासप्रेमी व नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, रणरागिणी छत्रपती ताराराणी यांच्या कार्याला योग्य तो मान मिळण्याच्या दृष्टीने हा महत्त्वाचा टप्पा ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# जेष्ठ नागरिकाला लुटणारी टोळी गजाआड, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात रिक्षात बसवून प्रवाशांचे खिसे कापणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने () पर्दाफाश केला आहे. एका ७० वर्षीय जेष्ठ नागरिकाला लुटणाऱ्या दोन आरोपींना पोलिसांनी जेरबंद केले असून, गुन्ह्यात वापरलेली रिक्षा जप्त केली आहे. मात्र, शहरात अशा घटनांची वाढती मालिका पाहता प्रवाशांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

दिनांक २९ मार्च २०२६ रोजी एकनाथ रामभाऊ बोडखे (वय ७०, रा. चांदई एक्को, ता. भोकरदन) हे जेष्ठ नागरिक विघ्नहर्ता हॉस्पिटल ते मंठा चौफुलीकडे जाण्यासाठी एका रिक्षामध्ये बसले होते. यावेळी रिक्षा चालक आणि त्यातील काही अज्ञात इसमांनी बोडखे यांच्या खिशातील ५,८५० रुपये रोख आणि त्यांच्या पत्नीचे आधारकार्ड अत्यंत शिताफीने चोरले. याप्रकरणी सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सीसीटीव्ही आणि गोपनीय माहितीमुळे आरोपी जाळ्यात

पोलीस अधीक्षक अजय कुमार बन्सल यांनी या गुन्ह्याच्या तपासाचे आदेश एलसीबीला दिले होते. पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने शहरातील ट्रॅफिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून संशयित रिक्षाचा क्रमांक ( २१ ०६६८) निष्पन्न झाला.



या माहितीच्या आधारे पोलिसांनी रिक्षा चालक शेख अस्लम शेख नसीर (रा. इंदिरा नगर, जालना) याला ताब्यात घेतले. त्याने त्याचा साथीदार सोहेल शेख नूर (रा. मिल्लत नगर, जालना) याच्या मदतीने हा गुन्हा केल्याची कबुली दिली. पोलिसांनी ८० हजार रुपये किमतीची रिक्षा जप्त केली असून दोन्ही आरोपींना सदर बाजार पोलिसांच्या स्वाधीन केले आहे.

**वाढत्या घटना आणि पोलिसांसमोर आव्हान**

जालन्यात रिक्षातील चोरीच्या घटनांनी आता धोक्याची पातळी ओलांडली आहे. काही दिवसांपूर्वीच एका वकिलालाही अशाच प्रकारे रिक्षात बसवून लुटण्यात आले होते. या घटनांमुळे नागरिक, विशेषतः जेष्ठ नागरिक आणि बाहेरून येणारे प्रवासी धास्तावले आहेत.

गंभीर मंथनाची गरज:

शहरात धावणाऱ्या हजारो रिक्षांपैकी किती रिक्षाचालकांची नोंदणी अधिकृत आहे? किती जणांकडे परवाना आणि बॅच आहे? यावर पोलीस प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. शेअरिंग रिक्षात मधल्या सीटवर प्रवाशांना बसवून गर्दीचा फायदा घेत चोरी करणारी ही टोळी सक्रिय आहे.

प्रशासनाकडून अपेक्षित पावले:

कडक तपासणी: रिक्षाचालकांचे चारित्र्य पडताळणी ( ) बंधनकारक करणे.

क्युआर कोड प्रणाली: प्रत्येक रिक्षात चालकाचे नाव, फोटो आणि मोबाईल नंबर असलेला कोड किंवा माहिती पत्रक लावणे.

साध्या वेशातील पोलीस: मुख्य चौफुली आणि बस स्थानक परिसरात साध्या वेशातील पोलिसांची गस्त वाढवणे.

प्रवासी जनजागृती: अनोळखी किंवा आधीच २-३ प्रवासी बसलेल्या रिक्षात बसताना सावध राहण्याचे आवाहन करणे.

ही यशस्वी कारवाई एलसीबीचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन खामगळ, पोउपनि राजेंद्र वाघ आणि त्यांच्या पथकाने केली असली, तरी शहरातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आता व्यापक अँटी-क्राईम मोहिमेची अपेक्षा जालनाकर व्यक्त करत आहेत

# समृद्धी महामार्गावर डिझेल लांबवणारी टोळी गजाआड

## जालना एलसीबीची मोठी कारवाई, स्कॉर्पिओसह मुद्देमाल जप्त

**जालना । प्रतिनिधी -** समृद्धी महामार्गावर उभ्या असलेल्या ट्रकमधून डिझेल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराला जेरबंद करण्यात जालना स्थानिक गुन्हे शाखेला () यश आले आहे. या कारवाईत पोलिसांनी ७ लाख रुपये किमतीची स्कॉर्पिओ गाडी जप्त केली असून, डिझेल चोरीचे एकूण ३ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

छत्तीसगड येथील ट्रक चालक धर्मेंद्र कुमार चंद्राकार हे २४ मार्च २०२६ रोजी आपला ट्रक (स्पंजने भरलेला) घेऊन जालनाकडे येत होते. पहाटे ५ वाजेच्या सुमारास गुंडेवाडी जवळील एका पेट्रोल पंपाजवळ ते विश्रांतीसाठी थांबले असताना, चोरट्यांनी त्यांच्या ट्रकच्या टाकीतून २०० लिटर डिझेल लंपास केले. चालक जागा झाल्याचे पाहून चोरटे त्यांच्या स्कॉर्पिओ वाहनातून पसार झाले. याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

अशी झाली कारवाई

गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांना तपासाचे आदेश दिले होते. तांत्रिक विश्लेषण आणि खबऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, हा गुन्हा संतोष अंबादास वाघमारे (रा. हरफळा, ता. जाफ्राबाद) याने आपल्या साथीदारांसह केल्याचे निष्पन्न झाले.

एलसीबीच्या पथकाने सापळा रचून संतोष वाघमारे याला देऊळगाव उगले (ता. जाफ्राबाद) येथून ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी त्याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली ७ लाख रुपये किमतीची महिंद्रा स्कॉर्पिओ (क्र. ४५ ९७९७) जप्त केली आहे.

तीन गुन्हे उघडकीस

आरोपीची अधिक चौकशी केली असता, त्याने समृद्धी महामार्ग आणि आसपासच्या परिसरात डिझेल चोरीचे इतरही गुन्हे केल्याचे कबूल केले. यामध्ये:

१. चंदनझिरा पोलीस ठाणे: गुरनं. १६८/२०२६ (ताजी घटना)

२. चंदनझिरा पोलीस ठाणे: गुरनं. ६७१/२०२५

३. जालना तालुका पोलीस ठाणे: गुरनं. १४२/२०२५

अशा एकूण तीन गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

तपास पथक

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पथकात पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि सचिन स्वाममळ, पोउपनि राजेंद्र वाघ, रामप्रसाद पव्हरे, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, ईरशाद पटेल, संदीप चिंचोले, सुधीर वाघमारे आणि जाफ्राबाद पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

आरोपीला पुढील कायदेशीर कारवाईसाठी चंदनझिरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून, त्याचे इतर साथीदार आणि चोरीचे डिझेल कोणाला विकले, याचा तपास पोलीस करत आहेत.



# महापूरुषांच्या जयंती नाचून नव्हे तर वाचून साजरी करणार



**जालना । प्रतिनिधी -** वाचन चळवळ घराघरात पोहोचविण्यासाठी १०० शिक्षक क्लब, जालन्याच्या वतीने महात्मा फुले यांच्या द्विशतकोत्तर तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती निमित्त महापुरुषांनी स्वतः लिहिलेले गुलामगिरी , माझी आत्मकथा व इतर ५०० पुस्तकाचे विद्यार्थ्यांना वर्षभर वाटप करण्यात येणार आहे.

त्याचा शुभारंभ आज शांतिनिकेतन विद्यामंदिर, जालना येथे पार पडला. त्यावेळी शिक्षक क्लब प्रमुख राजेभाऊ मगर बोलत होते.. महात्मा फ ुले यांचे द्विशतकोत्तर जयंती वर्ष साजरे होत असतांना महापुरुषांना आगळ्यावेगळ्या व वाचन संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी महापुरुषांनी लिहिलेले पुस्तके विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना वाटप करण्यात येणार आहेत

तर काही पुस्तके महापुरुषांच्या जीवन चरित्रावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षा घेऊन शंभर विद्यार्थ्यांना पुस्तके वाटप करण्यात येणार आहे. ह्या विद्यार्थ्यांनी आपल्या जवळच्या पाच मित्राकडून पुस्तक वाचन करून घेऊन वाचलेल्या पुस्तकाबद्दल स्वभाषेत परीक्षण करावे व त्यातून विजेत्या ठरलेल्या १०० विद्यार्थ्यांना पुस्तके भेट दिली जातील व ही विद्यार्थी परत घराघरांतून थोरा मोठ्या कडून पुस्तके वाचून घेतील असे नियोजन करून वाचन साखळीच्या माध्यमातून महापुरुष घराघरात पोहोचविण्याचा संकल्प असल्याचे सांगितले.

जालना शहरातील हजारोंवर विद्यार्थी या वर्षी या उपक्रमात सहभागी होणार आहेत. व ही जयंती महापुरुषांचे विचार वाचूनच साजरी करणार असा संकल्प विद्यार्थ्यांनी केला..

या प्रसंगी राजेभाऊ मगर,अशोक माधवले शांतिनिकेतन विद्यामंदिर शाळेचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वरजी गाढवे, प्रेमला पंडित, कांचन वाघ, किर्ती खैरे, सिमा इंगळे व किशोर शेळके, पांडुरंग वाजे, अमोल पवार, सुनील जाधव, गजानन दळवी व रामकिशन मोहिते इत्यादी उपस्थित होते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या स्वागताध्यक्षपदी सचिन कांबळे यांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आगामी १३५ व्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने जालना शहरात जय्यत तयारी सुरू झाली आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वपक्षीय नागरिक उत्सव समितीच्या महत्त्वपूर्ण बैठकीत, सन २०२६ च्या स्वागताध्यक्षपदी सचिन (नन्नू भाई) कांबळे यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. ही बैठक ज्येष्ठ नेते सुधाकरशेठ रत्नपारखे यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. जालना शहरात दरवर्षीप्रमाणे यंदाही १४ एप्रिल रोजी भीमजयंती मोठ्या उत्साहात, जल्लोषात आणि सामाजिक ऐक्याच्या वातावरणात साजरी करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

**नियोजन आणि रूपरेषा**

बैठकीत आगामी जयंती उत्सवाची रूपरेषा, मिरवणुकीचे नियोजन, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम, तसेच शहरातील विविध भागांतील समन्वय यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जयंती उत्सव हा केवळ एक सोहळा न राहता तो समता, बंधुता आणि संविधानाचा संदेश देणारा लोकउत्सव व्हावा, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. शहरात विविध ठिकाणी अभिवादन कार्यक्रम, पुष्पचक्र अर्पण, प्रभातफेरी आणि संविधान जनजागृतीचे कार्यक्रम आयोजित करण्याचा समितीचा मानस आहे.

समाजपरिवर्तनाचा उत्सव: सचिन कांबळे

स्वागताध्यक्षपदी निवड झाल्यानंतर सचिन कांबळे यांनी सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले की, ‘‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती ही समाजपरिवर्तन आणि मानवतेचा उत्सव आहे. सर्वांच्या सहकार्याने आणि एकोप्याने आपण हा उत्सव भव्य स्वरूपात साजरा करू.‘‘

**मान्यवरांची उपस्थिती**

या बैठकीस प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ नेते सुधाकरशेठ रत्नपारखे आणि ॲड. ब्रह्मानंद चव्हाण उपस्थित होते. तसेच समितीचे अध्यक्ष कपिल खरात, अशोक रगडे, भास्कर अण्णा रत्नपारखे, महेंद्र रत्नपारखे, सचिव शरद मांगधरे, राहुल खरात, ॲड. सिद्धार्थ चव्हाण, रणजित



निकाळजे, अनिल रत्नपारखे, प्रशांत भांगरे, नंदू पोकळे, बाळू बर्डे, कार्याध्यक्ष राहुल रत्नपारखे, सहसचिव अमित साळवे, प्रदीप रत्नपारखे, विजय लहाने, मस्के यांसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

१४ एप्रिलच्या या महामानवाच्या जयंती उत्सवात जालना जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## मारोती मॅकेवार यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**परतूर । प्रतिनिधी -** ध्येय एज्युकेशन फाउंडेशन च्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार परतूर तालुक्यातील वाघाडी येथील जिल्हा परिषद शाळेचे मारोती दत्तराव मॅकेवार यांना प्रदान करण्यात आला आहे.दि.२९ रोजी पुणे येथील ग.दि.माडगुळकर नाट्यगृहात पुरस्कार सोहळा संपन्न झाला. यावेळी.आ.अमित गोरखे, आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे, शिक्षणाधिकारी, डॉ.भाऊसाहेब कारेकर यांच्या उपस्थितीत ध्येय फाउंडेशनचे अध्यक्ष सुभाष शेंडगे व आदर्श शिक्षक दत्तात्रय वारे यांच्या हस्ते मारोती मॅकेवार यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. शाल श्रीफळ, स्मृतिचिन्ह, आणि प्रशस्तीपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले आहे.मॅकेवार हे शिक्षक विद्यार्थी प्रिय असून उपक्रमशील आहेत. त्यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना देण्यात आला आहे.या पुरस्कारा मुळे मॅकेवार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.



### जालना महानगरपालिकेला मिळाल्या पूर्णवेळ आयुक्त

## आयएएस अंजली शर्मा यांच्या खांद्यावर शहराच्या विकासाची धुरा

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराच्या विकासाला गती देण्यासाठी राज्य शासनाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून रिक्त असलेल्या जालना महानगरपालिकेच्या आयुक्त पदावर अखेर भारतीय प्रशासकीय सेवेतील () अधिकारी अंजली शर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचे सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी गुरुवारी (२ एप्रिल) या निवडीचे अधिकृत आदेश निर्गमित केले.

प्रशासकीय अनुभव आणि पार्श्वभूमी

अंजली शर्मा या २०२१ (काही नोंदीनुसार २०२२) बॅचच्या प्रतिभावान आयएएस अधिकारी आहेत. त्यांनी दिल्ली विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात पदवी संपादन केली असून प्रशासकीय सेवेत येण्यापूर्वी त्यांनी उत्तम शैक्षणिक कारकीर्द घडवली आहे. जालना येथे रुजू होण्यापूर्वी त्या नंदुरबार येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत होत्या. तेथील त्यांचा प्रशासकीय अनुभव जालना शहराच्या प्रलंबित समस्या सोडवण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे.

तातडीने पदभार स्वीकारण्याचे निर्दे श

जालना नगरपालिकेचे रूपांतर महानगरपालिकेत झाल्यानंतर आयुक्त पद रिक्त असल्याने, जिल्हाधिकारी श्रीमती अशिमा मित्तल यांच्याकडे या पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. मात्र, पूर्णवेळ आयुक्तांची आवश्यकता लक्षात घेता शासनाने ही नियुक्ती केली आहे. शर्मा यांनी आपला पदभार जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांच्याकडून तातडीने स्वीकारून सुप्रीमों () प्रणालीवर आपला अहवाल अपडेट करावा, अशा सूचना सामान्य प्रशासन विभागाने दिल्या आहेत.



शहरासमोरील आव्हाने आणि अपेक्षा

नगरपालिकेची महानगरपालिका झाल्यानंतर जालन्यातील नागरिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. नवनियुक्त आयुक्त अंजली शर्मा यांच्यासमोर खालील प्रमुख आव्हाने असतील:

पाणीपुरवठा: शहराचा विस्कळीत झालेला पाणीपुरवठा सुरळीत करणे.

रस्ते विकास: शहरातील अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था सुधारणे.

स्वच्छता मोहीम: कचरा व्यवस्थापन आणि ड्रेनेज लाईनचे प्रश्न मार्गी लावणे.

प्रशासकीय शिस्त: महापालिकेच्या कामकाजात पारदर्शकता आणि गती आणणे.

एक तरुण आणि ऊर्जावान अधिकारी मिळाल्याने जालन्यातील रखडलेल्या विकासकामांना आता नवसंजीवनी मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. प्रशासकीय वर्तुळातूनही या नियुक्तीचे स्वागत होत आहे.

## पान १ वरुन

### पुण्यात जबरी ...

कलम ३०९(४) भारतीय न्याय संहिता () नुसार गुन्हा दाखल असल्याचे निष्पन्न झाले.

आरोपी फारुख शेख याला त्याच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीमुळे पुणे परिसरातून तडीपार करण्यात आले होते. तडीपारीचा आदेश झुगारून तो केवळ पुण्यात वावरतच नव्हता, तर त्याने तिथे जबरी चोरीचा गुन्हा देखील केला. गुन्ह्यानंतर अटक टाळण्यासाठी तो जालन्यात येऊन लपला होता, मात्र जालना एलसीबीने त्याच्या मुसक्या आवळल्या.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने केली:

पोलीस निरीक्षक: पंकज जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक: सचिन खामगळ, पोलीस उपनिरीक्षक: राजेंद्र वाघ, अंमलदार: रमेश राठोड, प्रभाकर वाघ, इरशाद पटेल, संदीप चिंचोले, सतिष श्रीवास आणि रमेश काळे. आरोपी फारुख सत्तार शेख याला पुढील कायदेशीर तपासासाठी भोसरी एमआयडीसी (पुणे) पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

### सोन्या-चांदीच्या ...

सगळ्याच्या परिणामामुळे गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणुकीसाठी सोन्याचा आधार घेताना दिसत आहेत. दरम्यान महिनाभरापासून सोन्या चांदीच्या दरात घसरण पाहायला मिळतेय.

महिनाभरापूर्वी एक लाख ६१ हजार ८०० रुपयांवर असणाऱ्या सोन्याचा भाव मागच्या आठवड्यात १ लाख ४५ हजार रुपयांवर पोहोचला. काल (२ एप्रिल ) २४ कॅरेट सोन्याचा प्रति १० ग्रॅम दर १ लाख ५२ हजार ४९० रुपयांवर होता. चांदीचे दरही गेल्या महिन्याभरापासून घसरताना दिसत आहेत. महिनाभरापूर्वी २ लाख ६५,८८० रुपयांवर असणारी चांदी आठवड्याभरापूर्वी दोन लाख २७ हजार ९३० रुपयांवर पोहोचली होती. आज चांदीचा किलोमागे दर २ लाख ३२ हजार ९०० रुपये झालाय.

### योजनेच्या नावाखाली ...

गैरप्रकारांवर वेळीच आळा घातला गेला नाही, तर पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. राहुल रत्नपारखे यांनी आपल्या संतप्त भूमिकेत कठोर शब्दांत प्रतिक्रिया दिली असून, नागरिकांच्या हितासाठी मनसे रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही, असे स्पष्ट केले.

रुग्णांमध्ये संताप, प्रशासनाकडून कारवाईची अपेक्षा

दरम्यान, जालना शहरातील अनेक नागरिक व रुग्ण कुटुंबीयांमध्ये या विषयावर नाराजी व्यक्त होत असून, आरोग्य यंत्रणेतील पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवण्याची मागणी जोर धरत आहे. खाजगी रुग्णालयांमधील बिलिंग पद्धती, योजनेअंतर्गत उपचारांची अंमलबजावणी आणि रुग्णांकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्काबाबत प्रशासनाने स्पष्ट धोरण राबवावे, अशी मागणीही नागरिकांकडून होत आहे.

जालना शहरातील आरोग्यसेवेबाबत उपस्थित झालेल्या या गंभीर प्रश्नांवर आता जिल्हा प्रशासन व आरोग्य विभाग कोणती भूमिका घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## मंदिराची जागा हडपणारे दोन आरोपी ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील कन्हैया नगर भागातील श्री बनखेडी गडबडेश्वर महादेव मंदिराची करोडो रुपयांची जमीन बनावट कागदपत्रांच्या आधारे बळकावणाऱ्या टोळीवर सदर बाजार पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन मुख्य आरोपींना अटक केली आहे. न्यायालयाने त्यांना ४ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून आजच्या होणाऱ्या सुनावनीकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

जालना-देऊळगाव राजा रोडवरील कन्हैया नगर भागात श्री बनखेडी गडबडेश्वर महादेव देऊळ (नोंदणी क्रमांक -२१२६/जा) ही ऐतिहासिक संस्था आहे. या संस्थेच्या नावे नगर भूमापन क्रमांक १९९७ मध्ये सुमारे ६५,७९७.४ चौ.मी. एवढी अवाढव्य जागा आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगणमत करून या जमिनीच्या मिळकत पत्रिकेवर फेरफार केला. मूळ व्यवस्थापक मांगली व्यास यांचे नाव हटवून त्या जागी आरोपी भैय्यालाल बाबुलाल अहिर याचे नाव बेकायदेशीरपणे लावले. यासाठी बनावट कागदपत्रे तयार करून ती धर्मदाय सह-आयुक्त कार्यालयात सादर करण्यात आली आणि शासनाची तसेच संस्थेची फसवणूक करण्यात आली.

याप्रकरणी फिर्यादी सचिन विलकिसन कांबळे (रा. वरद गणेश मंदिर परिसर) यांनी सदर बाजार पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीवरून पोलिसांनी तपास करून दोन आरोपींना बेड्या ठोकल्या यात पारस लालचंद नंद (वय ६२, रा. गवळीपुरा, मामा चौक, जालना) व संतोष बाबुराव तांदळे (वय ६०, रा. गवळीपुरा, मामा चौक, जालना) एक आरोपी फरार असल्याची माहिती पोलीसांनी दिली.

अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना १ एप्रिल रोजी न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपींना ४ एप्रिल २०२६ पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणातील तिसरा आरोपी भैय्यालाल अहिर याचा शोध पोलीस घेत आहेत.

‘‘या गुन्ह्याचा सखोल तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंदसिंग साबळे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. बनावट कागदपत्रे तयार करण्यात आणखी कोणाचे हात गुंतले आहेत का, याचा शोध पोलीस घेत आहेत.‘‘



# महाराजस्व अभियानातून १३ हजार सेवा प्रदान

## महसूल विभागाचा पुढाकार; जनतेचे जागेवर समाधान

**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांतर्गत महसूल विभागाकडून जिल्ह्यातील जनतेला महसूलविषयक १३ हजार ६९५ सेवा प्रदान करण्यात आल्या आहेत. जालना जिल्ह्यातील जनतेला जागेवरच सेवा प्रदान करताना हाती प्रमाणपत्र मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव होते.

शासनाच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर राबविण्यात येत आहे. या शिबिरांतर्गत जिल्ह्यातील ८ तालुक्यात मंडळनिहाय आतापर्यंत शिबीरे पार पडली आहेत. त्यामध्ये सातबारातील दुरुस्ती, डिजीटल सातबारा प्रदान करणे, ८-अ उतारा आणि विविध प्रमाणपत्रे जनतेला उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. सर्वसामान्य विद्यार्थ्यांना



उत्पन्नाचा दाखला, नॉन-क्रिमीलेयर, राष्ट्रीयत्व, डोमेसाईल, वय, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. महसूल कार्यालयात प्रलंबित असलेल्या सातबारावरील दुरुस्ती नागरिकांना शिबिरातून जागेवरच करुन देण्यात आली. तसेच डिजीटल सातबारा तसेच विविध प्रमाणपत्राचा लाभ घेणाऱ्यांची संख्या अधिक होती. याशिवाय शिबिरात अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना जागेवरच प्रमाणपत्र देण्यात आले. एकूणच शिबिरात महसूल विभागाने घेतलेला पुढाकार बघता सहभागी झालेल्या जनता समाधानाने घराकडे परतली.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरांतर्गत जालना जिल्ह्यात एप्रिल आणि मे मध्येही महसूल मंडळनिहाय शिबिरे घेण्यात येणार आहेत. या शिबिरातून जनतेला जागेवर जावून सेवा प्रदान करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. जेणेकरुन जनतेला छोट्या-छोट्या कामांसाठी कार्यालयातील चकरा वाचतील. तसेच आर्थिक भार कमी होत वेळेचा अपव्यय टळणार आहे. तरी अधिकाधिक नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.

# हनुमान जयंती निमित्त मधुबन कॉलनीतील समर्थ हनुमान मंदिरात महाआरती

## नगरसेवक अश्विन आंबेकर यांच्या हस्ते विधिवत आयोजन; महाप्रसादालाही उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना । प्रतिनिधी -** हनुमान जयंतीनिमित्त प्रभाग क्रमांक ९ मधुबन कॉलनी येथील समर्थ हनुमान मंदिरात नगरसेवक अश्विन भास्करराव आंबेकर यांच्या हस्ते भक्तीमय वातावरणात महाआरती करण्यात आली. यावेळी परिसरात धार्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

हनुमान जयंतीच्या निमित्ताने मधुबन कॉलनीत महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दर्शन व आरतीचा लाभ घेतला.

यावेळी प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक महावीर ढाक्का यांनी इन्कम टॅक्स कॉलनी, घायाळ नगर, सोनल नगर आदी भागांमध्ये श्रीराम व हनुमान मंदिरांच्या उभारणीत पुढाकार घेऊन भक्तीमय वातावरण निर्माण केल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमादरम्यान समर्थ हनुमान मंदिराचे पुजारी बालाजी महाराज शेवतकर यांनी मंदिर परिसरातील भाविकांना भजन-कीर्तन ऐकण्यासाठी ध्वनीप्रणाली (माईक) व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी केली. त्यावर अश्विन आंबेकर यांनी याबाबत लवकरच योग्य ती व्यवस्था करण्यात येईल, असे आश्वासन दिले. या प्रसंगी शंकर घोडके, शंकर सातपुते, आशिष चव्हाण, संतोष इबितवार, अजय रासवे, भूषण वानखेडे, किरण अय्यर, रुपेश राऊत, विशाल सातपुते, रोनिस श्रीवास्तव, बंटी चव्हाण, शुभम इंगळे, आकाश चव्हाण, अनिल मोठे, ओंकार कावळे, दीपक खांडेभराड, महेश गोरे, अभय चव्हाण, मुन्ना करंडे आदींसह अनेक भाविक उपस्थित होते. हनुमान जयंतीच्या या धार्मिक कार्यक्रमामुळे मधुबन कॉलनी परिसरात भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.



# दिव्यांग सहाय्यक पोर्टलवर नोंदणी करा; शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे बाळासाहेब खरात यांचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी 'दिव्यांग सहाय्यक' पोर्टलवर तात्काळ नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा परिषद दिव्यांग कल्याण अधिकारी बाळासाहेब खरात यांनी केले आहे. या पोर्टलवरील नोंदणीमुळे दिव्यांगांना विविध योजना, सवलती आणि सुविधा मिळवणे अधिक सुलभ आणि पारदर्शक होणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



**दिव्यांग संघटनांच्या निवेदनाची दखल**

जालना जिल्ह्यातील अनेक दिव्यांग नागरिकांना पोर्टलची माहिती नसल्याने किंवा तांत्रिक अडचणींमुळे नोंदणी करण्यात अडचणी येत होत्या. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे आणि अयोध्या फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष आर. आर. पाटोळे यांनी खरात यांची भेट घेतली. नोंदणी प्रक्रिया गावपातळीपर्यंत सुलभ करावी, या मागणीचे निवेदन त्यांनी प्रशासनाला दिले होते. या मागणीची दखल घेत प्रशासनाने आता विशेष मोहीम हाती घेण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रशासकीय यंत्रणांना सूचना

नोंदणीची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विभागांना सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने खालील यंत्रणांचा समावेश आहे:

तहसील कार्यालय व महानगरपालिका.

पंचायत समिती व गट विकास अधिकारी.

अंगणवाडी सेविका व मदतनीस. स्थानिक प्रशासकीय कर्मचारी.

''नोंदणी केवळ कागदोपत्री न राहता ती प्रत्यक्ष दिव्यांगांपर्यंत पोहोचावी, यासाठी आम्ही सर्व विभागांना पत्राद्वारे निर्देश दिले आहेत. जास्तीत जास्त दिव्यांगांनी या सुविधेचा लाभ घ्यावा.''

बाळासाहेब खरात, दिव्यांग कल्याण अधिकारी, जालना.

नोंदणीचे महत्त्व आणि पुढील पावले

पोर्टलवर नोंदणी झाल्यानंतरच दिव्यांगांना शासकीय अनुदाने, सवलती, कृत्रिम उपकरणे, तसेच शैक्षणिक व सामाजिक कल्याण योजनांचा थेट लाभ घेता येणार आहे. तांत्रिक माहितीच्या अभावामुळे ज्यांची नोंदणी प्रलंबित आहे, त्यांना मदत करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि क्षेत्रीय कर्मचारी पुढाकार घेणार आहेत.

दिव्यांग संघटना आणि सामाजिक संस्थांनीही प्रशासनासोबत समन्वय साधून, एकही पात्र दिव्यांग व्यक्ती या प्रक्रियेतून सुटणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे. जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी तातडीने संबंधित कार्यालय किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने आपली नोंदणी पूर्ण करावी.

# बीएसएनएल कर्मचाऱ्यांच्या वेतन पुनरीक्षणासाठी खासदार डॉ. कल्याण काळे यांचे केंद्रीय दूरसंचार मंत्र्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी** - जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी भारत संचार निगम लिमिटेड मधील कर्मचाऱ्यांच्या मागील नऊ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या वेतन पुनरीक्षणाच्या प्रश्नाबाबत केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना निवेदन सादर केले आहे.

बीएसएनएल ही देशातील एक महत्त्वाची सार्वजनिक क्षेत्रातील दूरसंचार संस्था असून, ग्रामीण, दुर्गम व वंचित भागांमध्ये दूरसंचार सेवा पोहोचविण्यात तिची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिली आहे. खासदार डॉ. काळे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सुमारे ६० हजार बीएसएनएल कर्मचारी मागील जवळपास नऊ वर्षांपासून वेतन पुनरीक्षणापासून वंचित आहेत, ही अत्यंत गंभीर व अन्यायकारक बाब आहे.

केंद्र व राज्य शासन तसेच इतर सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये नियमित वेतन



पुनरीक्षण होत असताना बीएसएनएल कर्मचाऱ्यांवर होत असलेला हा भेदभाव त्यांच्या मनोबलावर विपरीत परिणाम करत असून त्यांच्या आर्थिक सुरक्षिततेलाही बाधा निर्माण करत आहे, असे त्यांनी अधोरेखित केले आहे.

तसेच, ''अफोर्डेबिलिटी क्लॉज'' या अटीमुळे वेतन पुनरीक्षणास विलंब होत असल्याचे निदर्शनास आणून देत, या अटीची पुनर्समीक्षा करण्याची मागणी करण्यात आली आहे. बीएसएनएल ही केवळ व्यावसायिक संस्था नसून डिजिटल इंडिया, ग्रामीण कनेक्टिव्हिटी आणि सामाजिक समावेशनासाठी महत्त्वपूर्ण आधारस्तंभ असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

खासदार डॉ. काळे यांनी केंद्र सरकारने तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन बीएसएनएल कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, अशी ठाम मागणी केली आहे. या प्रश्नाचा संबंध केवळ वेतनाशी नसून लाखो कुटुंबांच्या जीवनमानाशी आणि भविष्यासोबत असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

## श्री रेणुकादेवी यात्रा महोत्सवाची जय्यत तयारी

# बारा गाड्या प्रमुखपदी लखन कणीसे यांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील गांधीनगर भागातील श्री रेणुका देवी मंदिर संस्थानच्यावतीने सालाबादप्रमाणे यावर्षीही चैत्र चतुर्थीच्या मुहूर्तावर दि. ५ एप्रिल रोजी भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवातील प्रमुख आकर्षण असलेल्या बारा गाड्या ओढण्याच्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विशेष समिती गठीत करण्यात आली असून, समितीच्या प्रमुखपदी लखन कणीसे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.



यात्रा महोत्सवाच्या दिवशी सकाळी ७ वाजता देवीचा विधीवत अभिषेक व पूजा करण्यात येणार आहे. गांधीनगरची रेणुका माता ही नवसाला पावणारी देवी म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. आपली मनोकामना पूर्ण करण्यासाठी भाविक देवीला नवस बोलतात आणि तो पूर्ण झाल्यानंतर श्रद्धेपोटी बारा गाड्या ओढण्याचा संकल्प करतात. भाविकांच्या संकल्पानुसार एक, तीन किंवा पाच वर्षे याप्रमाणे बारा गाड्या ओढण्याची परंपरा येथे जोपासली जाते. हा सोहळा शांततेत आणि उत्साहात पार पडण्यासाठी संस्थानचे अध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांच्या अध्यक्षतेखाली भाविकांची महत्त्वाची बैठक पार पडली. या बैठकीत लखन कणीसे यांची बारा गाड्या समिती अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली असून, समितीमध्ये सदस्य म्हणून राजपाल पारचा, गणेश जल्लेवार, छगन देवरे, मंगेश छाबडा, बबन नामदे, जय छाबडा, रमेश श्रीराम, मनोज यशाल, अजय चलमेट्टी व अशोक वाटसर यांची निवड करण्यात आली आहे.

५ एप्रिल रोजी दुपारी ५ वाजता महाआरतीने बारा गाड्यांच्या कार्यक्रमाला सुरुवात होईल. रात्री १० वाजेपर्यंत सोहळा चालेल. त्यानंतर रात्री ११ ते सकाळी ८ वाजेपर्यंत आई भवानीचे सोंग काढले जाईल. ही सोंगे भाविकांच्या घरोघरी जाऊन दर्शन देतील.

नियोजन बैठकीत यात्रेमध्ये उपस्थितांनी भाविकांचा जास्तीत जास्त सहभाग नोंदवण्यासाठी विविध सूचना केल्या. बारा गाड्या ओढणाऱ्या भाविकांनी वेळेचे काटेकोर पालन करून संस्थानला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या बैठकीला शाहीर आप्पासाहेब उगले, गंगाधर पवार, काशिनाथ इंगळे, विलास पवार, ऋषी उगले, राजेश शिंदे, रवी धुमाळ, बाळू पवार आदींची उपस्थिती होती.

## समृद्धी महामार्ग अपघात

# मृतांच्या वारसांना १५ लाखांची मदत; लोकप्रतिनिधींच्या मध्यस्थीने तोडगा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर झालेल्या भीषण अपघातातील मृतांच्या नातेवाईकांना अखेर आर्थिक मदतीचा दिलासा मिळाला आहे. या अपघातात मृत्यू झालेल्या आठ महिलांच्या कुटुंबीयांना कंत्राटदाराकडून (गुत्तेदार) प्रत्येकी १५ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ४ लाख रुपये मदत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

**लोकप्रतिनिधींच्या मध्यस्थीने पेच सुटला**

कडवंची जवळ झालेल्या या भीषण अपघातात आठ महिलांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर मृतांच्या नातेवाईकांनी आक्रमक पवित्रा घेत, समाधानकारक मदत मिळेपर्यंत मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला होता. यामुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आमदार अर्जुन खोतकर आणि आमदार नारायण कुचे यांनी पुढाकार घेतला. अंबड चौफुली येथील शासकीय विश्रामगृहात (रेस्ट हाऊस) संबंधित कंत्राटदार, प्रशासन आणि नातेवाईक यांची संयुक्त बैठक पार पडली.



**मदतीचे स्वरूप आणि धनादेश वाटप**

बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, मृतांच्या वारसांना एकूण १५ लाख रुपये देण्यात येणार आहेत. त्यापैकी १० लाख रुपयांचे धनादेश तातडीने सुपूर्द करण्यात आले असून, उर्वरित ५ लाख रुपये एका महिन्यानंतर दिले जाणार आहेत. या बैठकीला उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, तहसीलदार छाया पवार, युवा सेनेचे अभिमन्यू खोतकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ए. जे. बोराडे, अॅड. शिवाजीराव आदमाने आणि दिनेश आदमाने यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

**एकूण मदतीचा आकडा वाढला**

राज्य शासनाने यापूर्वीच मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. आता कंत्राटदाराकडून जाहीर झालेल्या १५ लाखांच्या मदतीमुळे पीडित कुटुंबांना एकूण २० लाख रुपयांचा आधार मिळणार आहे. या मदतीच्या घोषणेनंतर नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्याची तयारी दर्शवली असून परिसरातील तणाव निवळला आहे.

**सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह**

मदत जाहीर झाली असली तरी, समृद्धी महामार्गावर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने आणि संबंधित यंत्रणेने अशा दुर्घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जालना जिल्ह्यातून जोर धरत आहे. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून अनेक कुटुंबे उघड्यावर पडली आहेत.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282.
अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.